दि. 07/03/2026

**प्रेसनोट**

# पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाची नांदेड मधील अवैध रेतीविरुध्द कारवाई

## 1 कोटी रुपयांची साधनसामुग्री व वाळू जप्त

नांदेड जिल्ह्यातील अवैध रेती उत्खनन व वाहतुकीविरुद्ध कारवाई करण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्या कार्यालयातील अधिकारी व अंमलदारांचे पथक मौजे माळाकौठा येथे पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक 06.03.2026 रोजी रात्री 21.30 दरम्यान पोलीस ठाणे मुदखेड हद्दीत माळकौठा येथील वाळू धक्कयावर कारवाई करत Tata कंपनीचे (2) हायवा, एक JCB मशीन यासह, एक लोखंडी हॉपर, एक छोटी बोट व नदीपात्रातून बाहेर काढून ठेवलेली (50) ब्रास वाळू, असा एकूण 01 कोटी 04 लाख 50 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात पोलीस ठाणे मुदखेड गुरनं 39/2026 कलम 303 (2), 3(5), 48(7), 48(8) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस ठाणे मुदखेड येथील पोउपनि शिंदे हे तपास करीत आहेत.

सदर कारवाईदरम्यान, घटनास्थळावरील एकंदर परिस्थितीवरून, माळकौठा येथील घाटावरुन मोठया प्रमाणावर अवैधरित्या वाळू उपसा, साठवणूक व वाहतूक होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

सदर कारवाईत, पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/संजीव जिंकलवाड, पोकॉ/ गणेश धुमाळ व पोकॉ/ कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांना प्रशंसापत्र देऊन त्यांचे अभिनंदन केले आहे.

आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती, नागरिकांनी नजीकच्या पोलीस ठाण्यास अथवा पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाच्या nandedrange.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर किंवा 91 50 100 100 या ‘खबर’हेल्पलाइनवर कळवून अशा अवैध व्यवसायांचा बिमोड करण्यासाठी आपला हातभार लावावा, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड